# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार , दि. ५ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १४४ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६६३ : पुण्याच्या लाल हालावर अचानकपणे केलेल्या हल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाची बोटे छाटली.

१९२२ : स्त्री–उध्दारक व थोर तत्त्वचिंतक पंडिता रमाबाई यांचे निधन.

१९४९ : भारत स्काऊट गाईडची स्थापना.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७३,३१९.५५ | +१८५.२३ (०.२५%) |
| डॉलर | ₹ ९२.६३ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | २१ |
| दिल्ली | ३० | १९ |
| मुंबई | ३३ | २५ |
| नागपूर | ३६ | २२ |
| पुणे | ३५ | १८ |

**सुविचार**

आपले आयुष्य हे आपल्या निर्णयांवर अवलंबून आहे. सजग आणि जाणीवपूर्वक निर्णय घेतल्याने आपले जीवन सुखमय होईल.

| सूर्योदय | - | सूर्यास्त |
|---|---|---|
| स.-६:१४ | | संध्या-६:४४ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | - चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५२,८०५/- | २,५०,०००/- |

# इराणच्या अणू प्रकल्पावर भीषण हल्ला

## अणू सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा पेटला ऐरणीवर; आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढली चिंता

वृत्तसंस्था । तेहरान

इराणमधील बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पाजवळ शनिवारी झालेल्या स्फोटात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती इराणी माध्यमांनी दिली आहे. या संघर्षाची सुरुवात झाल्यापासून या संवेदनशील ठिकाणावर हल्ला होण्याची ही चौथी वेळ आहे.



आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थाच्या माहितीनुसार स्फोटातील तुकड्यांमुळे प्रकल्पाच्या सुरक्षा पथकातील एका सदस्याचा मृत्यू झाला. या स्फोटामुळे प्रकल्पातील एका इमारतीचेही नुकसान झाले असून धक्क्याच्या लाटा आणि अवशेषांमुळे हानी झाली आहे. मात्र या घटनेनंतर किरणोत्सर्गाच्या पातळीत कोणतीही वाढ झालेली नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

**आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थाप्रमुखांना चिंता**

आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थाचे महासंचालक राफेल मारियानो ग्रोसी यांनी या हल्ल्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की अणुऊर्जा प्रकल्प किंवा त्याच्या आसपासच्या परिसरावर कोणत्याही परिस्थितीत हल्ला होऊ नये. अशा प्रकल्पांमधील केवळ रिॲक्टरच नव्हे तर इतर इमारतींमध्येही महत्त्वाची सुरक्षा यंत्रणा असू शकते. त्यामुळे अशा ठिकाणी होणारा कोणताही हल्ला अत्यंत धोकादायक ठरू शकतो. ग्रोसी यांनी पुन्हा एकदा सर्व पक्षांना संयम राखण्याचे आवाहन करत सांगितले की, असे हल्ले सुरू राहिल्यास मोठ्या अणू दुर्घटनेचा धोका निर्माण होऊ शकतो. या घटनेमुळे संवेदनशील अणुऊर्जा पायाभूत सुविधांवर होणाऱ्या सततच्या हल्ल्यांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंता वाढली आहे. परिस्थिती अधिक चिघळल्यास पर्यावरणीय आणि मानवी संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आंतरराष्ट्रीय निरीक्षक आणि आयएईए यांनी आतापर्यंत अशा अनेक घटनांनंतरही कोणताही किरणोत्सर्ग गळती झाल्याचे आढळलेले नाही. रशियाच्या अणुऊर्जा कंपनी रोसॲटॉमचे प्रमुख अलेक्सी लिखाचेव यांनी सांगितले की, मॉस्को दोन्ही देशांना स्थलांतराच्या मार्गांची माहिती देईल आणि ताफ्याच्या हालचालीदरम्यान कोणतीही लष्करी कारवाई होऊ नये, यासाठी सर्व मार्गांचा वापर केला जाईल. त्यांनी पुढे सांगितले की सुमारे २०० कर्मचाऱ्यांचा समावेश असलेला सुटकेचा अंतिम टप्पा पुढील आठवड्यात पार पडण्याची शक्यता आहे.

**• रशियाची युद्धविरामाची मागणी**

दरम्यान रशिया बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पातून आपल्या कर्मचाऱ्यांची सुरक्षित सुटका करण्यासाठी अमेरिका आणि इस्रायलला तात्पुरत्या युद्धविरामाचे आवाहन करणार असल्याचे वृत्त आरआयए नोव्होस्तीने दिले आहे.

**किरणोत्सर्गाचा वाढू शकतो धोका**

इराणचे परराष्ट्र मंत्री सईद अब्बास अराघची यांनी बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पाजवळील वारंवार हल्ल्यांबद्दल अमेरिका आणि इस्रायलवर टीका केली आहे. त्यांनी या घटनांमुळे गंभीर प्रादेशिक परिणाम होऊ शकतात, असा इशारा दिला. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये त्यांनी पाश्चिमात्य देशांच्या दुटप्पी भूमिकेवर टीका करत युक्रेनमधील झापोरिझ्झिया अणुऊर्जा प्रकल्पाजवळील संघर्षावेळी व्यक्त झालेल्या चिंतेची आठवण करून दिली. त्यांनी नमूद केले की बुशेहर प्रकल्पावर आतापर्यंत चार वेळा हल्ले झाले असून कोणतीही किरणोत्सर्गी गळती झाल्यास त्याचा परिणाम तेहरानवर नव्हे तर आखाती देशांच्या राजधानींवर होऊ शकतो. त्यांनी असेही सूचित केले की इराणच्या पेट्रोकेमिकल पायाभूत सुविधांवर होणारे अलीकडील हल्ले हे व्यापक धोरणाचा भाग असू शकतात.

**थोडक्यात**

### १२१ महिलांवर संस्था चालकाचा अत्याचार

**नाशिक ।** राज्यात गाजत असलेल्या नाशिमधील भोंदू अशोक खरात प्रकरणानंतर आता नाशिकमध्ये एका संस्था चालकाने तब्बल १२१ महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. गरजू महिलांना नोकरीचे आमिष दाखवून तब्बल १२१ महिलांचे लैंगिक शोषण केल्याने ६३ वर्षीय रवींद्र गणपत एरंडे याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ बनवून ते ब्लू फिल्म माफियांकडे विकल्याचा संशय आहे.

### सरकराचा नैसर्गिक वायू इंधनावर भर

**मुंबई ।** एलपीजी गॅस सिलेंडरचा पूरवठ्याला अडचणी येत असल्याने केंद्राने पीएनजी पूरवठा करण्यावर भर दिला आहे. वाहतूक क्षेत्र, घरगुती वापरासाठीचा पीएनजी, सीएनजीचा १००% पुरवठा केला जात असून, ग्राहकांना प्राधान्य दिले जात आहे. राज्य, केंद्र शासित प्रदेश तसेच केंद्रीय मंत्रालयांनी शहरी वायू इंधन वितरण सेवेच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या अर्जांना मंजुरी द्यावी अशी सूचना केंद्र सरकारने केली आहे.

## काळाची झडप! विहिरीत कार कोसळून भीषण अपघात

### ९ जणांचा करूण अंत

वृत्तसंस्था । नाशिक

**काल ३ एप्रिल रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नाशिकमधील दिंडोरीमध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. भरधाव वेगाने आलेली चारचाकी थेट विहिरीत कोसळून भीषण अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या अपघातात ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.**



या घटनेत सुनील दत्तात्रय दरगोडे (वय ३२), रेशमा सुनील दरगोडे (वय २७), आशा अनिल दरगोडे (वय ३२),गुणवती सुनील दरगोडे (वय ११),श्रेयश अनिल दरगोडे (वय ११),श्रावणी अनिल दरगोडे (वय ११), सृष्टी अनिल दरगोडे (वय १४), समृद्धी राजेंद्र दरगोडे (वय ७), श्रद्धा अनिल दरगोडे (वय १३) यांचा समावेश आहे. या घटनेची माहिती मिळताच (पान २ वर)

पोलिसांच्या माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला असलेल्या एका विहिरीत कार कोसळली. स्थानिक पोलीस आणि आपत्कालीन सेवांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि मध्यरात्री दोन क्रेन मदतीने त्यांनी कार आणि त्यातील प्रवाशांना विहिरीतून बाहेर काढले. मृतदेह दिंडोरी येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तसेच याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## अजित पवार गटातील २० आमदार शरद पवारांच्या संपर्कात?

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा राजकीय भूकंप!

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली असून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा हालचालींना वेग आला आहे.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील तब्बल १५ ते २० आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू असतानाच या हालचालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अजित पवार गटातील काही नेत्यांनी विलिनीकरणाला (पान २ वर)

## नागपूर हादरले : छेडछाडीला विरोध करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याची निर्घृण हत्या

वृत्तसंस्था । नागपूर

**नागपूरात एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. आपल्याच मुलीची छेड काढणार्या आरोपींना जाब विचारल्यानंतर पोलिस कर्मचार्यांची नराधम आरोपींनी हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. पंकज ठाकूर असे मृत कर्मचार्याचे नाव असून ते एसआरपीएफमध्ये कार्यरत होते. खून प्रकरणी आकाश मंडल आणि हर्षित मंडल या दोन भावांना पोलिसांनी अटक केली.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आकाश मंडल हा पंकज ठाकूर यांच्या १५ वर्षीय मुलीचा पाठलाग करत होता. मुलीने ही बाब वडिलांना सांगितल्यानंतर पंकज ठाकूर यांनी आकाशला मुलीपासून दूर राहण्याचा इशारा दिला मात्र आकाशने आपले वर्तन सुरूच ठेवले.

गुरुवारी रात्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित महाप्रसादाच्या कार्यक्रमात आरोपी आणि मुलगी पुन्हा समोरासमोर आले. आकाश मुलीशी बोलताना पाहून पंकज ठाकूर संतापले आणि त्यांच्यात वाद झाला. ठाकूर यांनी मुलीला घरी पाठवले, पण यानंतर घटनेने हिंसक वळण घेतले.

कार्यक्रमानंतर घरी जात असताना शाळेजवळ आरोपींनी पंकज ठाकूर यांना पुन्हा गाठले. सुरुवातीला शाब्दिक वाद आणि नंतर हाणामारी झाली. ठाकूर आणि त्यांचे मेहुणे आरोपींवर भारी पडू लागले, (पान २ वर)


# अमेरिकेतील भव्य अक्षरधाम मंदिर वादात

## मजुरांच्या शोषणाचे गंभीर आरोप

वृत्तसंस्था । वाशिंगटन

**अमेरिकेतील बीएपीएस स्वामीनारायण अक्षरधाम मंदिर सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. न्यू जर्सीमधील रॉबिन्सविले येथे बांधलेले हे मंदिर २०२३ मध्ये मोठ्या थाटामाटात उद्घाटन झाले होते.मात्र, मजुरांच्या शोषणाचे गंभीर आरोप होत आहे.**

भारताबाहेरील सर्वात मोठे हिंदू मंदिर म्हणून याची ओळख आहे. मात्र आता या मंदिराच्या बांधकामाशी संबंधित मजुरांनी केलेल्या आरोपांमुळे हा प्रकल्प चर्चेत आला आहे. हे मंदिर बीएपीएस स्वामीनारायण संस्था यांनी उभारले आहे. मंदिराच्या बांधकामासाठी राजस्थानसह भारतातील अनेक भागांतून कारागीर आणि मजूर नेण्यात आले होते.



त्यांनी सांगितले की, या कामासाठी त्यांना मोठी किंमत मोजावी लागली. मजुरांच्या म्हणण्यानुसार, २०१५ ते २०२३ या काळात काम करताना त्यांचे शोषण झाले. त्यांनी व्हिसा फसवणूक, कमी पगार, जास्त कामाचे तास आणि (पान २ वर)

➤ सुमारे १८५ एकर क्षेत्रात पसरलेले हे मंदिर १९१ फूट उंच आहे. मंदिरातील दगड बुल्गारिया, इटली, ग्रीस, तुर्की आणि भारतासह अनेक देशांतून आणण्यात आले आहेत. मंदिराच्या भिंतींवर रामायण आणि महाभारत यांसारख्या भारतीय कथा कोरलेल्या आहेत. मंदिरासमोर असलेल्या ब्रह्मकुंडात जगभरातील सुमारे ४०० नद्या आणि तलावांचे पाणी आणले गेले आहे. यात भारतातील गंगा आणि यमुना नद्यांचेही पाणी समाविष्ट आहे. एकूणच, जगभरातील श्रद्धेचे केंद्र असलेले हे मंदिर सध्या मजुरांच्या आरोपांमुळे वादात सापडले असून, या प्रकरणाची चौकशी आणि निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मन मोठं करून सर्वच पक्षांनी सुनेत्राताईंना पाठिंबा द्यावा

## बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीविषयी मुख्यमंत्री फडणवीसांचे राजकीय पक्षांना आवाहन

वृत्तसंस्था । मुंबई

**येत्या २३ एप्रिलला बारामती विधानसभेची पोटनिवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठं विधान केलं आहे.**

माझी अशी सर्वांना विनंती असेल की ही पोटनिवडणूक बिनविरोध झाली तर महाराष्ट्राला साजेशी अशा पद्धतीने परिस्थिती होईल. यापूर्वीही महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणुका केल्या आहेत, असे विधान फडणवीसांनी केलं आहे. पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, मला आठवते की जेव्हा आर. आर. पाटील यांचे निधन झाले होते. त्याही वेळेस ती पोटनिवडणूक भाजप आणि आम्ही ठरवले होते की लढणार नाही आणि ती निवडणूक बिनविरोध पार पडली होती. मला वाटते सर्वच पक्षांनी मन मोठे करून निवडणूक बिनविरोध केली पाहिजे, असे आवाहन फडणीसांनी केले आहे. बारामती आणि राहुरी या दोन विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आहे. या दोन्ही ठिकाणी काँग्रेसकडून उमेदवार देणार असल्याचे निश्चित मानल जात आहे. तसे संकेत काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन संपकाळ यांनी दिले आहेत. मात्र, महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या उबाठा गटाची भूमिका काय असेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तर राहुरी पोटनिवडणूक दिवंगत भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले लढणार आहेत. या दोन्ही ठिकाणच्या निवडणुका बिनविरोध करण्याचा मानस भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे.

**• नाशिकच्या घटनेवर व्यक्त केली संवेदना**




नाशिकमधील दिंडोरीत विहिरीत कार कोसळून अपघातात ९ जणांना मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याविषयी मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली. नाशिक अपघातातील ती गाडी विहिरीत पडली, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी माझ्यावर फोनवर चर्चा केली आणि तेथील परिस्थिती देखील सांगितली. असे सांगत मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण कुटुंबाच्या प्रति संवेदना व्यक्त केल्या.

## दिल्लीसह उत्तर भारत भूकंपाने हादरला; रिष्टर स्केलवर ५.९ तीव्रता

वृत्तसंस्था । दिल्ली

**देशाची राजधानी दिल्लीसह उत्तर भारताचा काही भाग शुक्रवारी रात्री भूकंपाच्या धक्क्याने हादरला. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.९ इतकी नोंदली गेली. सुदैवाने, त्यामध्ये कुठलीही जीवित वा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. रात्री ९.४५ वाजण्याच्या सुमारास भूकंपाचा धक्का बसला.**



दिल्ली, पंजाब, हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील काही भाग भूकंपामुळ काही सेकंद थरथरले. तो धक्का जाणवलेल्यांमध्ये घबराट पसरली. त्यातून अनेकांनी सुरक्षिततेचा उपाय म्हणून घरांमधून बाहेर पडून मोकळ्या जागी धाव घेतली. भूकंपाच्या केंद्रबिंदूची नोंद अफगाणिस्तानात जमिनीखाली सुमारे १५० किलोमीटर अंतरावर झाली. त्यामुळे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानचे काही भागही हादरले. (पान २ वर)

## संपादकीय

### होर्मुझ रणभूमीचा केंद्रबिंदू!

सध्याच्या इराण–अमेरिका संघर्षात अरबी आखात आणि होर्मुझ रास्ता हा नौदल आणि राजकीय रणभूमीचा केंद्रबिंदू बनला आहे. या संदर्भात अमेरिकेच्या नौदलाचा विशेषतः विमानवाहक युद्धनौका वापर आणि इराण गनिमी कावा व लहान वेगवान नावांच्या रणनीतीचे विश्लेषण तसेच आखातीय नौदलांची भूमिका आणि यातून मिळणारे युद्ध धडे यावर विश्लेषण गरजेचे आहे. २०२६च्या क्राइसिसमध्ये अमेरिकन नौदलाचा मुख्य आधार म्हणजे अनेक विमानवाहक युद्धनौका आधारित स्ट्राइक ग्रुप्स आहेत. या वेळी यूएसएनच्या अनेक सुपर कॅरियर्स–जसे की यूएसएस जेराल्ड आर. फोर्ड, यूएसएस अब्राहम लिंकन आणि यूएसएस जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश. यांना इराणजवळच्या पाण्यात तैनात करण्यात आले आहे, जिथून त्यांची विमाने इराणच्या लष्करी आधार, रॉकेट, मिसाइल साइट्स आणि नौदली सुविधांवर हल्ले चढवू शकतात. या नौसेनेची भूमिका फक्त हल्ला नसून अरबी आखातातील मित्र राष्ट्रांना सुरक्षा देण्याचीही आहे. विमानवाहक नौका ही एक भ्रमणशील विमानतळ म्हणून वापरली जाते, जिथून फायटर जेट्स, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर विमाने, अथअउड आणि स्ट्राइक ड्रोन यांच्या माध्यमातून वायुसेना नौसेनेचा एकत्रित दबाव टाकता येतो. यामुळे अमेरिकेला दूरवर फायर करण्याची क्षमता मिळते. होर्मुझची सामुद्रधुनी आणि पर्शियन आखात क्षेत्रात संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि बहरिन यांसारख्या देशांची नौदले तैनात आहेत. मात्र, या संघर्षात त्यांची भूमिका प्रामुख्याने सहकार्यात्मक आणि संरक्षणात्मक आहे. लॉजिस्टिक सपोर्ट : हे देश अमेरिकन आणि आंतरराष्ट्रीय नौदलांना नियमित रसद पुरवतात. त्यांच्या हवाईतळांचा आणि बंदरांचा उपयोग अमेरिकन सुपर–कॅरिअर्ससाठी लॉजिस्टिक हब म्हणून केला जातो. किनारपट्टी सुरक्षा : त्यांनी आपली किनारपट्टी संरक्षण प्रणाली अधिक सक्षम केली आहे. इराणकडून येणाऱ्या छोट्या नौकांच्या धोक्यावर लक्ष ठेवण्यासाठी हे देश सातत्याने गस्त घालतात. मर्यादा : या देशांच्या नौदलांनी इराणविरुद्धच्या थेट मोठ्या लष्करी कारवायांमध्ये सहभाग घेण्याचे टाळले असून, त्यांचे लक्ष केवळ व्यापारी मार्गांच्या सुरक्षेवर केंद्रित आहे. इराणकडे अमेरिकेसारख्या महाकाय युद्धनौका नसल्या तरी, त्यांनी होर्मुझच्या क्षेत्रात असममित युद्धनीती अवलंबली आहे. इराणचे इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स व इराणियन नेव्ही यांच्याकडे शेकडो स्पीड बोट्स आहेत. या नौका आकाराने लहान असल्या तरी त्या मशीनगन्स, रॉकेट लॉन्चर्स व जहाज–विरोधी क्षेपणास्त्रांनी सज्ज आहेत. इराणच्या रणनीतीचा मुख्य उद्देश अमेरिकन आणि आंतरराष्ट्रीय युद्धनौकांना दबावाखाली ठेवणे हा आहे. इराणच्या या वेगवान नौका आंतरराष्ट्रीय जहाजांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करतात. या युद्धतंत्रात अनेक छोट्या नौका एकत्र येऊन एका मोठ्या युद्धनौकेला चहूबाजूंनी घेरण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी मोठ्या युद्धनौकेला आपली संरक्षक यंत्रणा, गोळीबार किंवा इलेक्ट्रॉनिक वॉरफेअरचा वापर करावा लागतो. या छुप्या युद्धामुळे केवळ भौतिक नुकसानच नाही, तर मानसिक तणाव निर्माण करून जागतिक अर्थव्यवस्थेला खिळ घालण्याचा प्रयत्न इराणकडून केला जातो. होर्मुझ रास्ता जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या चोक पॉइंट्सपैकी एक आहे, कारण यातून जगातील २०% इतके कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू जातात. समुद्रामधील चोक पॉईंट ही संकल्पना जागतिक व्यापार आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. हा एक असा अरुंद समुद्री मार्ग असतो जिथून जहाजांची ये–जा मोठ्या प्रमाणात होते, दोन मोठ्या जलसाठ्यांना जोडणाऱ्या या अरुंद पट्ट्याला सामुद्रधुनी किंवा चोक पॉईंट म्हणतात. जर हा छोटा मार्ग बंद झाला, तर जहाजांना हजारो मैलांचा वळसा घालून जावे लागते, ज्यामुळे वेळ आणि इंधनाचा खर्च प्रचंड वाढतो. फक्त २१ मैल रुंदीचा हा समुद्रमार्ग जगातील तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. काही तेलवाहतूक जहाजांना नुकसान झाले, युद्धनीतीमध्ये चोक पॉईंटवर नियंत्रण मिळवणे म्हणजे संपूर्ण जगाची लाइफलाइन कापण्यासारखे असते. इराण आणि पश्चिम आशियातील तणावात होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील सर्वात धोकादायक चोक पॉईंट बनला आहे. जेव्हा जेव्हा अमेरिका किंवा पाश्चात्य देशांकडून इराणवर निर्बंध लादले जातात किंवा लष्करी दबाव वाढतो, तेव्हा इराण होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याची धमकी देतो. जागतिक व्यापारावर परिणाम करून आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी किंवा दबाव टाकण्यासाठी चोक पॉईंट्सचा वापर स्ट्रॅटेजिक वेपन म्हणून केला जातो. शत्रू देशाला मिळणारे अन्न, इंधन, शस्त्रास्त्रांचा पुरवठा या मार्गावर ताबा मिळवून रोखता येतो.

# नंदुरबार, शहादा तालुक्यांत होणार अपर तहसील कार्यालय

## राज्य शासनाचे गिफ्ट ; महसुली कामे वेगाने होण्यास मदत मिळणार

प्रतिनिधी । नंदुरबार

**राज्य शासनाने नंदुरबार आणि शहादा तहसीलदारांसह त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा व्याप काही अंशी कमी केला आहे. या दोन्ही तालुक्यांसाठी अपर तहसीलदार कार्यालयांना मंजुरी मिळाली असून, दोन्ही शहर व तालुक्यांची वाढलेली लोकसंख्या व कामाचा वाढता व्याप पाहता हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे दोन्ही तालुक्यांतील जनतेची महसुली कामे वेगाने होण्यास मदत मिळणार आहे.**



नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार व शहादा या दोन शहरांचा वेगाने विस्तार होत असून, या दोन्ही तालुक्यांची लोकसंख्याही दुपटीने वाढली आहे. यामुळे सध्या या दोन तालुक्यांसाठी असलेल्या तहसील कार्यालयांवर महसुली कामाचा ताण वाढला होता. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दोन दिवसांपूर्वी या दोन्ही तालुक्यांसाठी अपर तहसील कार्यालयांना मंजुरी दिली आहे. राज्याच्या महसूल विभागाने विद्यमान तहसील कार्यालयांवरील वाढत्या कामाच्या बोझ्याचा विचार करून राज्यभरातील विविध जिल्हाधिकारी कार्यालयांकडून अपर तहसील कार्यालयांसाठी प्रस्ताव मागवले होते. त्या अनुषंगाने नंदुरबार जिल्हा प्रशासनाने मार्च २०२५ मध्ये नंदुरबार व शहादा या दोन तालुक्यांसाठी हे प्रस्ताव पाठवले होते. त्याला मंजुरी मिळाली आणि दोन दिवसांपूर्वी दि.२ एप्रिल रोजी तसे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाले, अशी माहिती सूत्रांनी दिली.

राज्य शासनाच्या नव्या मंजुरीमुळे आता नंदुरबार जिल्ह्यात सहा तहसील, तर तीन अपर तहसील कार्यालये होणार आहेत. अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे याआधीच अपर तहसील कार्यालयाला मंजुरी मिळाली होती. आता जिल्ह्यात आणखी दोन अपर तहसील कार्यालये वाढणार असल्याने जिल्ह्यातील महसुली कामे वेगाने होण्यास मदत मिळणार आहे.

मोलगी येथे आधीपासूनच अपर तहसील कार्यालय सुरू करण्यात आले आहे. मात्र, तेथे अजूनही कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली नाही. आता मोलगीसह नंदुरबार व शहादा येथील नव्या अपर तहसील कार्यालयांना कर्मचारी वर्ग उपलब्ध व्हावा, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय लवकरच विभागीय आयुक्तांना पदभरतीचा आराखडा पाठवणार आहे. त्यास अंतिम मंजुरी मिळताच तिन्ही कार्यालयांसाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल.

## काथर्दे येथे एप्रिल कुलसाठी वृक्षारोपण

प्रतिनिधी । राणीपूर

काथर्दे खुर्दे जि.प.शाळेत एप्रिल फुल ऐवजी एप्रिल कूलसाठी साने गुरुजी मित्र मंडळातर्फे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संजय पटेल होते. यावेळी शैलजा पटेल, आशा चौधरी, साने गुरुजी मित्र मंडळाचे अध्यक्ष माणक चौधरी, सचिव गुलाबराव पवार, शाळा व्यस्थापन समिती अध्यक्षा गौरी वळवी, पोलिस पाटील ईश्वर वळवी, उपसरपंच गणेश वळवी, मुख्याध्यापक विजय सोनवणे, तुकाराम अलट आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षाचे चित्र व त्याची फायदे लिहून ४७ विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत भाग घेतला होता.

## विजेच्या तारांवर झाडे पडल्याने वाढला धोका; उपाययोजना करण्याची मागणी

प्रतिनिधी । चोपडा

**शहरात काल झालेल्या अवकाळी पावसाने व अतिवृष्टीने मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून रस्त्यावर पडल्याची घटना घडली आहे. काही ठिकाणी ही झाडे थेट विजेच्या खांबांवर व तारांवर कोसळल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. चोपडा शहरात त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी विरोधी पक्षनेते गजेंद्र जयस्वाल यांनी केली आहे.**



झाडे रस्त्यावर पडल्यामुळे शहरातील विविध भागांमध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असून नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. तसेच विजेच्या तारांवर झाडे पडल्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. परिणामी नागरिकांना अंधारात राहण्याची वेळ येत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. यासोबत नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्ष नेते तथा नगरसेवक गजेंद्र जयस्वाल यांनी चोपडा नगरपालिकेने तात्काळ कारवाई करून रस्त्यावर पडलेली झाडे हटवावीत, तसेच विजेच्या खांबांवर व तारांवर पडलेली झाडे त्वरित दूर करावीत, अशी मागणी केली आहे. येणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा घटना टाळण्यासाठी एमएसईबी वीज वितरण कंपनी व नगरपालिका यांनी संयुक्तपणे शहरातील रस्त्यांलगतच्या झाडांची पाहणी करून विजेच्या तारांजवळील धोकादायक फांद्यांची छाटणी करावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असल्याने प्रशासनाने विलंब न करता तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही गजेंद्र जयस्वाल यांनी दिला आहे. या निवेदनावर गजेंद्र जयस्वाल, नरेंद्र पाटील, भूपेंद्र गुजराथी, संध्या नरेश महाजन, पूजा रणजीत देशमुख, डॉ रोहन महेंद्र पाटील, शरद पाटील, शकीलाबी इसाक बागवान, तिलकचांद शहा या नगरसेवकांच्या सह्या आहेत.

## नवापूर येथे सव्वादोन लाख मतदारांची पडताळणी

प्रतिनिधी । शहादा

**नवापूर विधानसभा मतदारसंघात विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार पडताळणी मोहीम जोरात सुरू आहे. प्रशासनाच्या वतीने ग्रामपंचायत ते नगरपरिषद स्तरावर विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.**

या मोहिमेद्वारे मतदार यादी अचूक, अद्ययावत व पारदर्शक ठेवण्यावर विशेष भर दिला जात आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, मतदारसंघातील एकूण ३ लाख ९६६ मतदारांपैकी आतापर्यंत २ लाख २० हजार ५६५ (७३.२९ टक्के) मतदारांचे पडताळणी व मॅपिंग पूर्ण झाले असून उर्वरित ८० हजार ४०१ मतदारांचे काम प्रलंबित आहे. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दि. ३० एप्रिल रोजी सर्व ग्रामपंचायत स्तरावर विशेष मतदार पडताळणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात बीएलओ, पर्यवेक्षक, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक तसेच संबंधित कर्मचारी यांनी गावागावांत जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली. मतदारांची नावे, पत्ते, वय आणि इतर तपशीलांची खात्री करून नोंदी अद्ययावत करण्यात आल्या. ज्या मतदारांची पडताळणी बाकी आहे, त्यांच्यापर्यंत पोहोचून प्रक्रिया पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. नवापूर नगरपरिषद हद्दीत तहसील कार्यालयाच्या निवडणूक शाखा व नगरपरिषद प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली टाऊन हॉल येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात नगरपरिषद क्षेत्रातील २७ यादी भागांतील मतदारांसाठी पडताळणी व दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली माहिती तपासून आवश्यक दुरुस्त्या केल्या. प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, प्रत्येक मतदाराने स्वतःची तसेच कुटुंबातील सदस्यांची नावे मतदार यादीत पडताळून घ्यावीत. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मतदाराचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, या मोहिमेमुळे मतदानाचा हक्क अधिक प्रभावीपणे बजावता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे नवापूर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक होण्यास मोठी मदत होणार आहे.

## प्रताप विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिकापदी माधुरी पाटील

प्रतिनिधी । चोपडा

**येथील प्रताप विद्यामंदिरांचे माजी शिक्षक स्व.एस.डी. पवार तावसेकर यांची भाची माधुरी वामन पाटील माचलेकर यांना नुकतीच मुख्याध्यापिकापदी पदोन्नती मिळाली आहे.**



शाळांमधील पैशांचा आर्थिक व्यवहार न करता निव्वळ गुणवत्तेवर शिक्षक भरती करणारे व १००% कॉपीमुक्त अभियान यशस्वीरित्या राबविणारे तसेच शाळेच्या नावातील मंदिर शब्दाचे पावित्र्य जपणारे प्रताप विद्यामंदिर शाळेत माधुरी पाटील यांना मिळालेली मुख्याध्यापिका पदाची पदोन्नती निश्चितच त्यांच्यासह भगिनीसाठी अभिमानास्पद आहे.

चोपडा शिक्षण मंडळ ही संस्था अल्पभाषिक असल्याने मुख्याध्यापक पद सेवा ज्येष्ठतेनुसार देणे न देणे अल्प भाषिक संस्थेत संस्था चालकांवर अवलंबून असते, असे असतानादेखील नैतिक मूल्य शुचिता पाळणाऱ्या आदर्श संस्थेने माधुरी पाटील यांना त्यांच्या सेवा ज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापिकापद दिल्याने संस्थाचालक राजा मयूर व सचिव माधुरी मयूर व मयूर परिवाराच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## पान १ वरुन

### काळाची झडप! विहिरीत......

रात्री उशिरापर्यंत , प्रशासन व स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचाव कार्य राबविण्यात आले. रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम सुरू होती. यावेळी घटनास्थळी नागरिकांचा मोठा जमाव जमला होता. दरम्यान, नाशिकमधील दिंडोरीमध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने चारचाकी कार थेट विहिरीत कोसळून भीषण अपघात झाल्याची माहिती मिळत आहे.या अपघातात ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

### राष्ट्रवादीत पुन्हा भूकंप!......

विरोध दर्शवला असला, तरी त्याच गटातील एका मंत्र्याने शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती मिळत आहे. या भेटीत दोन्ही गटांच्या एकत्रीकरणावर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षातील सततच्या अंतर्गत वादांमुळे काही आमदार अस्वस्थ आहेत. मतदारसंघातील जनसंपर्क आणि राजकीय प्रभाव कमी होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे भविष्यातील राजकीय वाटचालीसाठी ते पर्याय शोधत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर काही आमदार पुन्हा शरद पवार यांच्या गटात जाण्याचा विचार करत असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.

### अमेरिकेतील भव्य अक्षरधाम......

आरोग्य सुविधांचा अभाव यासारखे गंभीर आरोप केले आहेत. काही मजुरांनी सांगितले की, त्यांच्याकडून आठवड्यात तब्बल ९० तास काम करून घेतले जात होते. पण त्यांना तासाला फक्त १.२० डॉलर इतकाच मोबदला दिला जात होता. याशिवाय, काही मजुरांचे पासपोर्ट जप्त करण्यात आले होते आणि त्यांना कुटुंबीयांशी संपर्क साधण्याची परवानगीही नव्हती, असेही आरोप करण्यात आले आहेत. आजारी पडल्यावर योग्य वैद्यकीय उपचार न दिल्याचेही त्यांनी सांगितले आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे काही मजुरांचा मृत्यू. रिपोर्टनुसार, सिलिकोसिस या फुफ्फुसांच्या आजारामुळे दोन मजुरांचा मृत्यू झाला. हा आजार दगड घासताना निर्माण होणाऱ्या सिलिका धुळेमुळे होतो. याशिवाय इतर अनेक मजुरांना श्वसनाचे त्रास, क्षयरोग (टीबी) आणि क्रॉनिक ब्रॉन्कायटिससारख्या आजारांचा सामना करावा लागला.मात्र मंदिर प्रशासनाने हे सर्व आरोप फेटाळले आहेत. संस्थेच्या म्हणण्यानुसार, मजुरांना काम सुरू करण्यापूर्वी सुरक्षेसाठी आवश्यक साधने जसे की मास्क, हातमोजे आणि बूट देण्यात आले होते. तसेच कामगारांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची पूर्ण काळजी घेतल्याचा दावा करण्यात आला आहे.

### नागपूर हादरले : छेडछाडीला......

तेव्हा हर्षित मंडलने चाकू काढून पंकज ठाकूर यांच्यावर सपासप वार केले. ते खाली कोसळताच आरोपींनी त्यांच्यावर पुन्हा हल्ला करत गंभीर जखमी केले. आरोपी मृत झाल्याचे समजून घटनास्थळावरून पळून गेले.

### दिल्लीसह उत्तर भारत......

सकाळी राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सांगितले की, बुधवारी सकाळी अफगाणिस्तानातील हिंदूकुश प्रदेशात ५.९ तीव्रतेचा भूकंप झाला, ज्याचे धक्के दिल्ली–एनसीआर प्रदेशासह भारतातील अनेक भागात जाणवले. एनसीएसच्या मते, भूकंप ७५ किलोमीटर खोलीवर झाला. विशेषतः भूकंपाच्या केंद्राजवळ, गंभीर नुकसान करण्यासाठी ५.९ तीव्रतेचा भूकंप पुरेसा मानला जातो. तथापि, अद्याप कोणत्याही जीवितहानी किंवा नुकसानीचे वृत्त नाही.

## साहित्यिक रमेश पाटील सक्षमरत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील आडगाव येथील कवी लेखक व साहित्यिक रमेश जे. पाटील यांना सक्षमरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नाशिक येथे काल हनुमान जयंतीनिमित्त सक्षम पोलीस टाइम्स वृत्तपत्रातर्फे त्यांना सन्मानचिन्ह शाल व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.**



व्यासपीठावर आदिनाथ आखाडा त्रिंबकेश्वरचे पिठाधीश्वर योगी विश्वनाथ बाबाजी, सक्षम पोलीस टाईमचे मुख्य संपादक विलास पाटील, निवासी संपादक मनोहर अहिरे, नगरसेविका यावेळी उपस्थित होत्या. अशोका समूहाच्या द इन्स्टिट्यूट ऑफ करिअर हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात अनेक मान्यवरांना यावेळी गौरविण्यात आले. त्यात पूजा नंदगिरी, बाबा भामरे, रामदास कुंदे, डॉ. मनीषा वाघ, नागपूर सोलापूर येथील समाजातील अनेक मान्यवर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले विविध क्षेत्रात आपला नावलौकिक प्राप्त गुणवंतांचा यावेळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन मनोहर अहिरे यांनी केले.

## उष्णतेच्या लाटेतही हिरवाई जपणारा बोराडीचा वृक्षप्रेमी : हिम्मत पवार

प्रतिनिधी । बोराडी

**परिसरात दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत असून उष्णतेच्या लाटेमुळे नदी–नाल्यांचे पाणी आटण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी परिसरातील झाडे व नव्याने लावलेल्या रोपांना पाण्याची कमतरता भासू लागली आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत बोराडी येथील वृक्षप्रेमी हिम्मत पवार यांनी पुढाकार घेत परिसरातील झाडे व रोपांचे संगोपन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेतले आहे.**

आजच्या धावपळीच्या आणि व्यस्त जीवनशैलीत अनेकांना स्वतःसाठीही वेळ मिळत नाही, अशा वेळी समाजासाठी वेळ काढणारे व्यक्तिमत्त्व दुर्मिळच म्हणावे लागेल. हिम्मत पवार हे दररोज आपल्या दिनचर्येतून वेळ काढून सकाळी व संध्याकाळी शेतात तसेच परिसरात लावलेल्या झाडांना नियमित पाणी देत आहेत. ते स्वतः पाण्याची व्यवस्था करून रोपांची निगा राखत असल्यामुळे उन्हाळ्याच्या कडक झळांमध्येही ही झाडे हिरवीगार दिसत आहेत. बोराडी ग्रामपंचायत अंतर्गत माजी वसुंधरा अभियान व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत गावात विविध उपक्रम राबविण्यात येत असून गावातील अनेक युवक विविध उपक्रम हाती घेत आहेत. यातील हिम्मत पवार यांनी देखील केवळ झाडांचे संरक्षणच होत नाही, तर पर्यावरण संवर्धनाचा एक प्रेरणादायी संदेशही समाजात पोहोचत आहे. स्थानिक नागरिकांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक करत इतरांनीही अशा प्रकारे पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. हिम्मत पवार यांचे हे निस्वार्थी कार्य करीत असून बोराडी परिसरासाठी एक आदर्श ठरत आहे. पर्यावरण जपण्यासाठी प्रत्येकाने अशाच प्रकारे पुढे यावे, असा संदेश त्यांच्या कृतीतून स्पष्टपणे दिसून येतो. या उपक्रमाबद्दल पंतप्रधान आत्मनिर्भर अभियान संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल रंधे, सरपंच सुखदेव मालचे व बोराडी ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचे कौतुक केले.

## विराट हिंदू संमेलन उत्साहात; प्रेरणादायी विचारांनी श्रोते मंत्रमुग्ध

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील शाहूनगरातील हनुमान मंदीर परिसरात विराट हिंदू संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. प्रमुख वक्त्यांनी हिंदुत्वाच्या विचारातून प्रगती कशी साधता येते. याचे विवेचन अभ्यासपूर्ण शैलीत केले. प्रेरणादायी विचारांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले.**







या हिंदू संमेलनाचे आयोजन शाहुनगर सकल हिंदू समाज समितीतर्फे करण्यात आले होते. रिंगरोड ललित कला भवन जवळील हनुमान मंदीर येथुन शोभायात्रेला सुरुवात झाली. मोठ्या संख्येने समाज बांधव शोभायात्रेत सहभागी झाले होते. ही शोभायात्रा शाहुनगरातील तपस्वी हनुमान मंदीराजवळ आली. त्यानंतर याठिकाणी सहा वाजता हिंदू संमेलनास प्रारंभ झाला. धर्मशास्त्र मार्गदर्शक विनायकराव जोशी, पश्चिम क्षेत्र प्रचारक प्रमुख अनंत देशपांडे यांना व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आले होते. प्रतिमा पूजन वारकरी गोपाळ सोनार यांच्याहस्ते करण्यात आले. सामुहिक गीत ॲड. प्रवीण झवंर तसेच सहकाऱ्यांनी सादर केले. चंद्रकांत जिवडे यांनी प्रमुख अतिथीचा परिचय करुन दिला. यानंतर प्रमुख अतिथी अनंत देशपांडे यांचा सत्कार हिंदू मेळावा समितीचे अध्यक्ष अशोक जाधव यांनी तर विनायकराव जोशी यांचा सत्कार समितीच्या उपाध्यक्षा स्वाती देवरे यांनी केला.

प्रास्ताविक सार्थक हितेंद्र टेकावडे यांनी केले. समिती अध्यक्ष अशोक जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख वक्ते अनंत देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. उल्लेखनीय कार्याबद्दल गोपाळ सोनार, गणेश सुर्यवंशी, पुरोहित भुषण महाराज पाठक यांना व्यासपीठावर निमंत्रित करुन मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करुन गौरविण्यात आले. उपस्थितांनी टाळ्या वाजवित या उपक्रमाचे कौतुक केले. या मेळाव्याला हौसिंग सोसायटी,जे. डी.सी.सी.बॅंक कॉलनी, दत्त कॉलनी, खान्देश मिल कॉलनी, शाहूनगर परिसरातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. विनायकराव जोशी यांच्या आशीर्वचनातून उपस्थित मंत्रमुग्ध झाले. त्यांनी यशस्वी जीवन वाटचालीचा मंत्रघोष दिला.

हर्षदा अशोक जिवडे हिने पसायदान सादर केले. सूत्रसंचालन सचिन बोरसे यांनी केले. तर आभार राजदिप प्रकाश पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला प्रदिप चौधरी, हितेंद्र टेकावडे, मयुर मुळीक, कैलास पाटील यांच्यासह हिंदू प्रेमी तरुणांचे सहकार्य लाभले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# बिलवाडीजवळील पुलासह चौक सुशोभीकरण करणार

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची ग्वाही; विविध विकासकामांचे लोकार्पण

प्रतिनिधी । जळगाव

**बिलवाडी गावाने नेहमीच मला भरभरून प्रेम आणि सहकार्य दिले आहे. गावातील ग्रामस्थांची एकजूट ही खरोखरच कौतुकास्पद आहे. गावाजवळील नदीवर पुलाचे काम लवकरच मंजूर करणार असून गावातील चौकाचे सुशोभीकरणही करण्यात येईल. अशी ग्वाही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. ते बिलवाडी येथे विविध विकासकामांच्या लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.**



पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालय संरक्षण भिंत, दलित वस्तीत सामाजिक सभागृह (बौद्ध विहार) व स्मशानभूमीला संरक्षण भिंतीचे लोकार्पण करण्यात आले. तसेच गावांतर्गत काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजनही करण्यात आले. कार्यक्रम जल्लोषपूर्ण वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पालकमंत्री यांचे ग्रामपंचायत व ग्रामस्थांतर्फे शाल श्रीफळ व बुके देऊन भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक श्री.साळुंखे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख धोंडू जगताप यांनी मानले.

**यांची होती प्रमुख उपस्थिती**

यावेळी सरपंच दिनोद पाटील, उपसरपंच कविता पाटील, माजी जि. प. सदस्य पवन सोनवणे, माजी सभापती नंदू बाबा पाटील, उपजिल्हाप्रमुख रवी कापडणे, ग्रामपंचायत सदस्य आबा मिस्तरी, अनिल पाटील, सुपडू गायकवाड, समाधान गुजर, लताबाई पाटील, डॉ. भरत पाटील, भगवान पाटील, योगराज गुजर, हभप धनराज महाराज, सुधाकर सोनवणे, पोलीस पाटील सुवर्णा उमरे, साहेबराव वराडे, सचिन पाटील, बापू थोरात, समाधान बडगुजर, डॉ. सुधाकर पाटील, विजय आमले, राजू पाटील, महेंद्र राजपूत, गोरख पाटील, विश्वनाथ मंडपे, संदीप सुरळकर यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिवसेना व युवा सेनेचे पदाधिकारी तसेच बिलवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरात राबवले दोन दिवस विशेष स्वच्छता अभियान

## महापौरांच्या संकल्पनेतून बी.जे.मार्केटचा कायापालट



प्रतिनिधी । जळगाव

**गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या निकाली काढण्यासाठी जळगाव महानगरपालिकेच्या कर्तव्यदक्ष महापौर दीपमाला काळे यांनी आक्रमक पाऊल उचलले आहे. माझं जळगाव, स्वच्छ जळगाव या ब्रीदवाक्यानुसार, महापौरांच्या संकल्पनेतून गुरुवारी आणि शुक्रवारी जुन्या व नव्या दोन्ही बी.जे. मार्केटमध्ये विशेष साफसफाई अभियान राबवण्यात आले.**

नुकत्याच झालेल्या महासभेत शिवसेनेचे गटनेते विष्णू भंगाळे आणि नगरसेविका अर्चना पाटील यांनी मार्केटमधील अस्वच्छतेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. या प्रश्नांची तातडीने दखल घेत आरोग्य विभागातर्फे गुरुवारी (दि.२ एप्रिल) व शुक्रवारी (दि.३ एप्रिल) स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यामध्ये मार्केटमधील प्रसाधनगृहांची पूर्ण स्वच्छता करण्यात आली. कर्तव्यात कसूर करणाऱ्या ठेकेदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाहीदेखील सुरू झाली आहे.

केवळ स्वच्छताच नाही, तर मार्केटचा परिसर मोकळा करण्यासाठी अतिक्रमण विभागाने आजूबाजूचे अतिक्रमण हटवले आहे. तसेच विद्युत विभागातर्फे ज्या ठिकाणी पथदिवे नाहीत, तिथे सर्वेक्षण पूर्ण करून नवे दिवे लावण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. तुटलेले रेलिंग आणि इतर किरकोळ बांधकामांची पाहणी बांधकाम विभागाने केली असून, पुढील १५ दिवसांत हे काम पूर्ण करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे.

**महापौरांकडून थेट पाहणी अन् आदेश**

शुक्रवारी सकाळी महापौर दीपमाला काळे यांनी स्वतः मार्केटमध्ये जाऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी मार्केटमध्ये साचणारे पाणी आणि प्रसाधनगृहांच्या गळतीबाबत त्यांनी संताप व्यक्त करत, या त्रुटी तात्काळ दूर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले.

मार्केटमधील बदल पाहून मार्केट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर दीपमाला काळे यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. अनेक वर्षांपासून या समस्या जैसे थे होत्या. मात्र, महापौरांच्या पुढाकारामुळे मार्केटने मोकळा श्वास घेतला आहे. हे अभियान यापुढेही सुरू राहावे, यासाठी आम्ही महापालिकेला पूर्ण सहकार्य करू, असे आश्वासन पदाधिकाऱ्यांनी महापौरांना दिले.

हे अभियान आरोग्य विभागाचे मनपाचे सहाय्यक आयुक्त (आरोग्य) उदय पाटील यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी रमेश कांबळे, स्वच्छता निरीक्षक रुपेश भालेराव, मुकेश पाटील, मयूर सपकाळे, मुकादम विशाल चांगरे, बीव्हीजी सुपरवायझर संदीप शर्मा आणि गणेश कोळी यांच्या टीमने यशस्वी केले.

## थोडक्यात

### जळगावात डंपरच्या धडकेत तरुण जखमी

**जळगाव ।** शहरातील अयोध्या नगर भागात भरधाव डंपरने दुचाकीला समोरासमोर धडक दिल्याने भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाला आहे. खोटे नगरातील रहिवासी दीपक अरुण राऊत (वय ३८) हे २ एप्रिल रोजी पहाटे २.३० वाजेच्या सुमारास आपल्या रॉयल ३५० बुलेटने (क्र. एमएच-१९, डी ए २१३७) पेट्रोल भरण्यासाठी जात होते. समोरून येणाऱ्या भरधाव डंपरने (क्र. एमएच-१९, झेड-४१००) त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दीपक राऊत यांच्या दोन्ही पायांना, हाताला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली असून डंपर चालक घटनास्थळावरून पसार झाला. एमआयडीसी पोलीस ठाण्यात डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सावद्यात १० ते १२ कुत्र्यांचा चिमुरड्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न

**सावदा ।** सावदा येथील ख्वाजा गरीब नवाजनगर भागात १० ते १२ रानटी कुत्र्यांच्या झुंडीने एका निष्पाप चिमुरड्याला घेरले असताना, स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता एका तरुणाने धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला. ही सर्व थरारक घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून या बहादूर तरुणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. दोन दिवसांपूर्वी ख्वाजा गरीब नवाजनगर परिसरात एक लहान बालक एकटा असताना अचानक १० ते १२ भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने त्याला लक्ष्य केले. कुत्रे त्या बालकावर तुटून पडणार इतक्यात शेजारीच असलेले शेख बालू शेख मुनीर यांच्या ही बाब लक्षात आली. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता बालकाच्या दिशेने धाव घेतली. कुत्र्यांना पळवून लावताना शेख बालू यांचा पाय मुरगळला आणि ते जखमी झाले, मात्र त्यांनी जिद्द न हारता बालकाचे प्राण वाचवले. नगरपालिकेने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.

# तिरळेपणा तपासणी शिबीरात १५० जणांची मोफत तपासणी

प्रतिनिधी । जळगाव

**पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान आणि डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात आयोजित तिरळेपणा मोफत शस्त्रक्रिया शिबीरात पहिल्याच दिवशी १५० जणांची तपासणी करण्यात आली. या शिबीराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून तपासणीसाठी रूग्णांची गर्दी होत आहे.**

राष्ट्रीय बालस्वास्थ व जिल्हा अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान आणि डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने १९९ वे तिरळेपणा मोफत शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दि १ व २ एप्रिल रोजी तपासणी देखिल करण्यात आली. पुण्याच्या तज्ञांची टीम आज दाखल झाली असून दीपप्रज्वलनाने शस्त्रक्रिया शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, प्रख्यात नेत्रतज्ञ डॉ. मधुसूदन झंवर, विभागप्रमुख डॉ. एन.एस. आर्विकर, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, हृदयविकार तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, डॉ. नि.तू. पाटील, डॉ. रेणूका पाटील, डॉ. निखील



चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सकाळी ९ ते ५ यावेळेत सतत तीन वेळा लिम्का बुक रेकॉर्ड करणारे डॉ. मधुसूदन झंवर हे स्वत: रूग्णांची तपासणी व शस्त्रक्रिया करीत आहे. त्यांच्यासमवेत २० डॉक्टरांची टीम देखील या शिबीरात सहभागी आहेत. वैद्यकीय रूग्णालयातील नेत्र विभागाचे प्रमुख डॉ. एन.एस. आर्विकर, डॉ. निखील चौधरी यांच्या उपस्थितीत हे शिबीर होत आहे. शिबीरात १५० जणांची नोंदणी करण्यात आली असून त्यांची तपासणी देखील करण्यात आली आहे. दि. ३ ते ५ एप्रिल या कालावधीत गरजू रूग्णांवर मोफत तिरणेपणा शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

**जिल्ह्यात प्रथमच तिरळेपणाचे शिबीर**

जळगाव जिल्ह्यात प्रथमच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात मोफत तिरळेपणा तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे तपासणीसाठी रूग्णांची मोठी गर्दी होत आहे. तिरळेपणा दूर करण्यासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाने घेतलेला पुढाकार हा कौतुकास्पद ठरत आहे.

# जिल्ह्यात मतदार यादीचे सरासरी ७० टक्के मॅपिंग पूर्ण

प्रतिनिधी । जळगाव

**केंद्र शासनाच्या निर्देशानुसार निवडणूक आयोगांतर्गत देशपातळीवर मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम अंमलबजावणी केली जात आहे. जळगाव जिल्ह्यात ११ विधानसभा मतदार संघात बीएलओ स्तरावरून घरोघरी जाऊन मतदारांची माहिती घेत सखोल पुनर्निरीक्षण केले जात आहे. जिल्ह्यात ३७ लाख ३२ हजार ५७९ मतदारांपैकी आतापर्यंत २३ लाख ४ हजार ८५६ सरासरी ७०.८६ टक्के मतदारांचे मॅपिंगचे काम पूर्ण झाले आहे.**

यापूर्वी २००२ मध्ये विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. सद्यस्थितीत मतदारांनी २०१४, २०१९ तसेच २०२४ च्या यादीनुसार मतदान केले आहे. परंतु, २००२ मध्ये यादीत नसेल, तर आपल्या आई, वडील, आजी किंवा आजोबा यांची वरीलप्रमाणे २००२ ची माहिती आपल्या संबंधित बीएलओकडे त्वरित द्यावी. आपल्या भागातील (मतदार केंद्रस्तरीय अधिकारी बीएलओ) यांच्याशी संपर्क साधा आणि तुमचे आजचे नाव २००२ च्या नावाशी मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

# पिंपळगाव परिसरात अवैध व्यवसायांचा हैदोस

## संबंधित अधिकाऱ्याची बदली करावी; सामाजिक कार्यकर्ते उपोषणाच्या तयारीत

प्रतिनिधी । पाचोरा

**प्रति पंढरपूर म्हणून वारकऱ्यांचे श्रद्धास्थान पिंपळगाव (हरेश्वर) गाव आणि पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये अवैध व्यवसायांचे ग्रहण लागले आहे. मागील पाच ते दहा वर्षांपासून राजरोसपणे उघड्यावर सट्टा, मटका,जुगार, देशी, विदेशी गावठी दारूविक्री, रेती वाहतूक असे बेकायदेशीर अवैध व्यवसायांचा हैदोस सुरू आहे. या अवैध व्यवसायांना पायबंद घालण्याची मागणी आ.किशोर पाटील यांच्याकडे सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.**

पिंपळगाव आणि हद्दीतील सातगाव डोंगरी, शिंदाड, वरखेडी, कुऱ्हाड, लोहारा, आंबे वडगाव आणि अन्य गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध व्यवसाय पोलिसांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचे समजते! या संदर्भात काही सामाजिक कार्यकर्ते यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पिंपळगाव हद्दीतील गावांमधील अवैध व्यवसाय कायमचे बंद करण्यासाठी आवाज उठवत आहे. पाचोरा उपविभागीय पोलिस अधिकारी, जळगाव पोलिस अधीक्षक,



नाशिक विभागाचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांचेकडे लेखी तक्रारी करून देखील पिंपळगाव परिक्षेत्र हद्दीतील अवैध व्यवसाय बंद होत नसून जोमाने सुरू आहे. पत्रकारांनी बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर त्या पत्रकारांना पोलिस ठाण्यात बोलावून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रकार होत असल्याचे कळते. अवैध व्यवसायाबाबत जास्तच बोंबाबोंब झाल्यास अधिकारी आपल्या मर्जीतल्या पोलिसांना कार्यवाही करण्यासाठी आदेश काढतात. आदेशाचे पालन करून ठराविक अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर थातुर - मातुर कार्यवाही करून पोलिस दप्तरी नोंद दाखवून वरिष्ठांचे समाधान आणि जनतेची दिशाभूल करण्याचा प्रकार केला जातो. मागील काही दिवसांत एका गावातील दोन महिलांच्या विनयभंगाचा गुन्हा दाखल तक्रारींकडे अधिकारी आणि तपास अधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली नसल्याने शेवटी तक्रारदारांनी आमदार किशोर पाटील यांची भेट घेऊन या ठाण्यात सुरू असलेली मनमानी आणि वाढत्या गुन्हेगारीच्या संदर्भात पुरावे दाखवून पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि पोलिसांच्या मनमानी कामकाजाच्या तक्रारी आमदारांकडे केल्या. काही सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार पाचोरा प्रांताधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने दि.१४ एप्रिल रोजी उपोषण करून या पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याची तात्काळ बदली करावी, असा पवित्रा घेणार आहे.

# सिक्युरिटी इन्चार्जकडून महिलेला अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

प्रतिनिधी । जळगाव

**धरणगाव तालुक्यातील बांभोरी परिसरातील एका खासगी कंपनीत कार्यरत सिक्युरिटी इन्चार्जकडून महिला सिक्युरिटी गार्डवर अत्याचार करून तिचा अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तसेच या प्रकरणाची वाच्यता केल्यास संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.**

याबाबत माहिती अशी की, जळगाव शहरात वास्तव्यास असलेली एक महिला बांभोरी येथील कंपनीत सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करते. सप्टेंबर २०२५ मध्ये तिची मुलगी आजारी असल्याने तिला दोन दिवसांची रजा हवी होती. त्यासाठी ती सिक्युरिटी इन्चार्ज जनार्दन (पूर्ण नाव अज्ञात) यांच्याकडे अर्ज देण्यासाठी गेली असता, त्याने तिच्याशी अयोग्य वर्तन करत तू मला खुश कर, मी तुला सुट्टी देतो आणि पगारही कापणार नाही, असे म्हणत तिच्याशी अंगलगट करण्याचा प्रयत्न केला.

यावेळी संबंधित इन्चार्जने महिलेवर अत्याचार केल्याचा आरोप असून, त्या कृत्याचा व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रीत करून तो व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच पोलिसांत तक्रार केल्यास तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यानंतर २१ मार्च रोजी आरोपीने कंपनीत नव्याने रुजू झालेल्या मुलींना आपल्याकडे पाठवून त्याला खुश करण्यास सांगण्याचा दबाव संबंधित महिलेवर टाकला. सततच्या त्रासाला कंटाळून संबंधित महिलेने हा प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितला. कुटुंबीयांनी धीर देत पोलिसांत तक्रार करण्याचा सल्ला दिल्यानंतर तिने पाळधी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या प्रकरणी पाळधी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रवीण तांदळे करीत आहेत. या घटनेमुळे औद्योगिक क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# जळगावात भव्य आर्ट गॅलरी उभारणार : पालकमंत्री गुलाबराव पाटील

## बालचित्रकार अभिराज निकमच्या यथार्थ प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी घोषणा

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरात मोठ्या शहरांच्या धर्तीवर भव्य आर्ट गॅलरी व कला संकुल उभारण्यात येणार असल्याची घोषणा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केली. बालचित्रकार अभिराज निकम यांच्या यथार्थ या चित्रप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.**



यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, अभिराज हा केवळ रंग भरत नाही, तर भावना आणि वास्तवाला आकार देतो. अशा गुणी कलाकारांना प्रोत्साहन देणे ही आपली जबाबदारी आहे. हा बालचित्रकार राज्यात नव्हे तर देशात जळगावचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी अभिराजच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल बोलताना त्याच्या आई-वडिलांचे तसेच गुरु चित्रकार सचिन मुसळे यांचे अभिनंदन केले. माझ्यासह शासन अश्या कलाकारांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बालचित्रकार अभिराज निकम यांच्या कलेने भारावून गेलेल्या पालकमंत्र्यांनी त्याला वैयक्तिक पातळीवर सहकार्य करत त्याच्या पाठीशी उभे राहण्याचा शब्द दिला. यावेळी अभिराजनेही आपल्या कुंचल्यातून साकारलेले पालकमंत्र्यांचे चित्र भेट देत भावनिक कृतज्ञता व्यक्त केली.

पु.ना. गाडगीळ आर्ट गॅलरीत आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी ज्येष्ठ रंगकर्मी शंभू पाटील यांनी शहरात स्वतंत्र कला संकुलाची गरज व्यक्त केली. त्यांच्या या मागणीला तात्काळ प्रतिसाद देत पालकमंत्र्यांनी महापालिकेच्या सहकार्याने कला संकुल उभारण्याची घोषणा केली. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी व नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी महापालिकेकडून पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अभिराज निकम हा इयत्ता आठवीचा विद्यार्थी असून तो चित्रकार सचिन मुसळे यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे. सध्या पु. ना. गाडगीळ आर्ट गॅलरीत सुरू असलेल्या या प्रदर्शनात त्याच्या विविध चित्रांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन मुसळे यांनी केले. तर सूत्रसंचालन अक्षय नेहे यांनी केले. आभार प्रदर्शन अभिराज निकम यांनी मानले. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ रंगकर्मी शंभू पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, उपमहापौर मनोज चौधरी, महिला आघाडी संपर्कप्रमुख सरिता कोल्हे-माळी, नगरसेवक गणेश सोनवणे, हर्षल मावळे, नगरसेवक अ‍ॅड. दिलीप पोकळे, अक्षय नेहे, तसेच अभिराजचे वडील मनोज निकम व आई शीतल निकम यांच्यासह कला रसिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वादळी पावसानंतर चोपडा नगरपरिषदेकडून युद्धपातळीवर उपाययोजना

## मुख्याधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणीत प्लास्टिक विक्रेते-अतिक्रमणधारकांना तंबी

प्रतिनिधी । चोपडा

**शहरात दि.२ एप्रिल रोजी झालेल्या जोराच्या वाऱ्यासह वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर, मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी आज शहराच्या विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासकीय यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले. यावेळी त्यांच्यासोबत स्वच्छता निरीक्षक, विद्युत अभियंता आणि नगरपरिषदेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.**





**प्रत्यक्ष पाहणी आणि सूचना**

मुख्याधिकारी झंवर यांनी धनवाडी फाटा, देशमुख संकुल, पंकज स्टॉप, मेनरोड आणि एकविरानगर या भागांची बारकाईने पाहणी केली. पावसामुळे शहरात ठिकठिकाणी पाणी साचले होते, तर काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. विशेषतः गटारींमध्ये प्लास्टिक अडकल्यामुळे पाणी साचल्याचे निदर्शनास आले.

**प्लास्टिक बंदीचा इशारा**

या पाहणी दरम्यान धनवाडी फाटा ते पंकज स्टॉप या परिसरात रस्त्यालगतच्या अतिक्रमणधारकांमुळे पाणी निचरा होण्यास अडथळा येत असल्याचे दिसून आले. मुख्याधिकाऱ्यांनी संबंधितांना कडक सूचना देत अतिक्रमण त्वरित हटवण्याचे आदेश दिले. तसेच प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांवर संताप व्यक्त करत, पुन्हा प्लास्टिक वापरल्यास कठोर दंडात्मक कारवाई करण्याची तंबी मुख्याधिकारी झंवर यांनी दिली.

स्वच्छता निरीक्षक दीपाली साळुंखे व मुकादम यांना आजच्या आज सर्व गटारींमधील प्लास्टिक व कचरा काढून पाणी प्रवाहित करण्याचे आदेश दिले. तसेच नगर अभियंता डिगंबर वाघ यांना ज्या ठिकाणी पाणी तुंबण्याची समस्या गंभीर आहे, तिथे तात्काळ पर्यायी गटार व्यवस्था करून पाण्याचा निचरा करण्याचे निर्देश मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी दिले. विद्युत अभियंता प्रमोद पाटील यांना वादळामुळे सैल झालेल्या तारा सुव्यवस्थित करण्याच्या आणि रात्रीच्या वेळी पथदिवे बंद राहणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शहरातील समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनीही फोनद्वारे प्रशासनाला अवगत केले होते. त्या अनुषंगाने चोपडा नगर परिषदेच्या टीमने तातडीने रस्त्यावर उतरून काम सुरू केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रशासन आपल्या दारी येऊन समस्या सोडवत असल्याचे पाहून शहरवासीयांनी या मोहिमेचे स्वागत केले.

या पाहणी दौऱ्यात स्वच्छता निरीक्षक दीपाली साळुंखे, विद्युत अभियंता प्रमोद पाटील, शहर समन्वयक स्वप्निल धनगर, उमेश कापरे, मुकादम सुनील बाविस्कर, राहुल सपकाळे, जयेश बागरे आदी कर्मचारी सक्रिय सहभागी होते. शहरातील जनजीवन विस्कळीत होऊ नये, यासाठी नगरपरिषद प्रशासन पूर्ण क्षमतेने काम करत आहे. नागरिकांनीही गटारीत प्लास्टिक टाकणे टाळावे व प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी केले आहे.

## थोडक्यात

### चोपडा येथे महाशोभा यात्रेची तयारी

**चोपडा ।** गायीला सेवा, सुरक्षा व सन्मान मिळावा, यासाठी संपूर्ण भारतात गो सन्मान आवाहन अभियानचा प्रचार आणि प्रसार जोरात सुरु आहे. चोपडा तालुक्यात अभियानाची जोरदार तयारी चालू असून २७ एप्रिल रोजी महाशोभा यात्रा निघणार आहे. या कामी तालुक्यातील गोभक्त, संत, महंत, गो-प्रेमी शेतकरी नेते मंडळी कामास लागली आहे. तालुक्यातील अनेक खेड्यावर जनजागृतीचे काम चालू आहे. गोहत्या बंदीसाठी कडक कायदा लागू करा, गाईला राष्ट्रमातेचा दर्जा द्या व गायीला सेवा प्रदान करा, अशा मागण्यांचे प्रार्थना पत्र शोभायात्रेद्वारे तहसीलदार यांना देण्यात येणार आहे. शोभायात्रेत दहा हजार गो प्रेमी सहभागी होतील. तयारीसाठी दि. ७ एप्रिल रोजी चोपडा गांधी चौकातील श्रीराम मंदिरात सायं. ६ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

### बेस्ट प्रिंसीपल अॅवार्डने प्रा.राकेश रामटेके सन्मानित

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके यांना क्वीक हिल फाऊंडेशन यांनी बेस्ट प्रिंसीपल या अॅवार्डने सन्मानित केले आहे. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा राष्ट्रीय अॅवार्ड-२०२६ चे आयोजन क्वीक हिल फाऊंडेशन, पुणे येथे केले होते. यामध्ये भारतातील ३६ महाविद्यालय व २ विद्यापीठ यांचे नामांकन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. रामटेके यांना अॅवार्ड देण्यात आला. यावेळी क्वीक हिल फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा काटकर व सायबर सेलचे पोलिस अधिक्षक संजय शिंत्रे उपस्थित होते.

# बोरद येथे विराट हिंदू संमेलन उत्साहात

प्रतिनिधी । बोरद

**बोरद येथे हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली असून या निमित्ताने आयोजित विराट हिंदू संमेलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकल हिंदू समाज व उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.**




हनुमान जयंतीनिमित्त सकाळपासूनच हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भजन, कीर्तन व पूजा-अर्चा यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. ग्रामस्थांच्या वतीने मंदिरात भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी सुमारे चार वाजता राम मंदिरापासून श्रीरामाच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. संत आशीर्वचनासाठी कैलास महाराज उपस्थित होते. त्यांनी हिंदू धर्माची महान परंपरा, संस्कृतीचे जतन आणि समाजातील एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. विशेष अतिथी जितेंद्र पाडवी यांनी आपल्या भाषणात तळोदा तालुक्यातील रावलापाणी येथील आदिवासी क्रांतिकारकांचा इतिहास उलगडून सांगितला. त्यांनी नमूद केले की, १९४३ साली रावलापाणी येथे ब्रिटिश सत्तेविरोधात आदिवासी बांधवांनी मोठा संघर्ष उभारला होता. या आंदोलनावर ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबारात अनेकांनी बलिदान दिले. ज्यामुळे रावलापानी हे आदिवासी क्रांतीचे प्रतीक बनले आहे. आरती, पूजा ही हिंदू धर्मात दिलेली परंपरा आहे. संत गुलाब महाराज यांनी हिंदू समाज एकत्र राहावा, यासाठी या परंपरांना चालना दिली. आदिवासी समाज वेगळा नसून तो हिंदूच आहे, असे जितेंद्र पाडवी (आप की जय परिवार प्रमुख, रंजनपूर) यांनी सांगितले. यावेळी संत गुलाब महाराज व संत रामदास महाराज यांच्या कार्याचाही उल्लेख करण्यात आला. हिंदू समाज एकत्रित राहण्यासाठी त्यांनी दिलेला संदेश आजही मार्गदर्शक ठरत असल्याचे वक्त्यांनी सांगितले. मार्गदर्शक वक्ते पुरुषोत्तम वसंत काळे यांनी हिंदू समाजातील एकता, सामाजिक समरसता आणि संस्कृतीचे जतन यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच युवकांनी संघटित राहून समाजकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले होते. उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. आयोजकांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व यशस्वी ठरला. एकूणच, हनुमान जयंतीनिमित्त बोरद येथे पार पडलेले हे संमेलन धार्मिक, सामाजिक आणि ऐतिहासिक जाणिवा जागृत करणारे ठरले.

**या शोभायात्रेत गावातील युवक, महिला व बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ढोल-ताशांचा गजर, धार्मिक घोषणाबाजी आणि पारंपरिक वेशभूषेमुळे संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीत आकर्षक सजवलेल्या वाहनावरती श्रीरामाची प्रतिमा ठेवण्यात आली होती, ज्यामुळे सर्वांचे लक्ष वेधले गेले. सायंकाळी सहा वाजता जय योगेश्वर मंडप येथे कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी आयोजित विराट हिंदू संमेलनात विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. -**

# आरसीसी ऑफ राईपतर्फे मृत्युपत्र विषयी उद्या व्याख्यान

प्रतिनिधी । जळगाव

येथील रोटरी क्लब जळगाव पुरस्कृत आरसीसी ऑफ राईपतर्फे दि. ६ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता गणपती नगरातील रोटरी हॉल येथे अॅड. महेश भोकरीकर यांचे मृत्युपत्र या महत्त्वपूर्ण विषयावर जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांमध्ये कायदे विषयक जनजागृतीच्या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. जळगावकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्षा पल्लवी शिंपी व सचिव योगिता पाटील यांनी केले आहे. या व्याख्यानात मृत्युपत्र म्हणजे काय, त्याचे महत्त्व, तयार करताना घ्यावयाची काळजी, तसेच कायदेशीर प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# वेळोदे येथे प्राणप्रतिष्ठा, संगीतमय रामकथा

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यांतील वेळोदे येथे साधुसंतांच्या आशीर्वादाने मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व भव्य संगीतमय राम कथेचे आयोजन दि. ५ ते १२ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.**



कथा प्रवक्ता ह.भ.प. किशोर मोरदळकर हे असणार आहेत. संगीतमय राम कथेची वेळ रात्री आठ ते दहा वाजेपर्यंत राहणार आहे. शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन व महाप्रसाद (भंडारा) दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत होईल. या उत्सवादरम्यान श्री श्री महामंडलेश्वर १००८, शिवगिरी महाराज निफाड व हपभ बबन महाराज महाले धरणगाव यांच्या शुभहस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठा होत आहे.

श्रीराम कथेचे आयोजक अनिल भीमराव बोरसे (इंजिनियर बदलापूर) हे असून येथील समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ, तरुण मित्र मंडळ हे सहकार्य करीत आहेत. तरी परिसरातील भाविक-भक्तांनी व ग्रामस्थांनी कीर्तनाचा व संगीतमय राम कथेचा आणि महाप्रसादाच्या लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# धरणगावी घरपोच गॅससाठी वाहने रवाना; एजन्सीवर गर्दी झाली कमी

प्रतिनिधी । धरणगाव

**घरपोच गॅस सिलिंडरसाठी धरणगावात वाहने रवाना झाली असून पावतीसाठीच्या रांगा बंद झाल्याने गोडाऊनवरील गर्दी कमी झाली आहे.**



एजन्सीवर मोठ्या प्रमाणात ग्राहकांनी ऐन उन्हा - तान्हात गॅस सिलिंडरसाठी मोठी गर्दी केली होती. गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याच्या अफवेने नागरिकांनी सिलिंडरची पावती घेण्यासाठी तसेच गोडाऊन वरून सिलिंडर घेण्यासाठी मोठ्या रांगा लावल्या होत्या.

गॅस एजन्सीवर अचानक नागरिकांनी गर्दी केल्याने गॅस एजन्सीवर मोठा ताण निर्माण झाला होता. त्यामुळे गरजूंना सिलिंडर मिळणे कठीण झाले होते. यासंदर्भात नगरसेवक सुनील चौधरी यांच्यासह नागरिकांनी तहसीलदार यांना निवेदन देत घरपोच सिलिंडरच्या मागणीचे निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेत तहसीलदार व पुरवठा अधिकारी यांनी घरपोच सिलिंडर देण्याचे गॅस एजन्सीला आदेश दिलेत. त्यानुसार एजन्सी चालकाने कार्यालयावर सिलिंडरची पावती देणे बंद केले आणि बुकिंग केलेल्या ग्राहकांना घरपोच सिलिंडर वाटप सुरु केले आहे. तरी नागरिकांनी गोडावूनवर येण्याची आवश्यकता नसून घरपोचसाठी वाहने रवाना झाली असून बुकिंग केलेल्या प्रत्येक ग्राहकाला टप्या टप्याने घरपोच सिलिंडर दिले जाणार असल्याचे नगरसेवक सुनील चौधरी यांनी सांगितले.

# सीए मुकेश चोरडिया यांचा गौरव



प्रतिनिधी । पारोळा

राष्ट्रीय स्व.संघ जिल्हा कार्यकारणी सदस्य सीए मुकेश चोरडिया यांना पेरू रिपब्लिक या देशाचा लिमा विद्यापीठाकडून आर्थिक साक्षरता आणि फंड मॅनेजमेंट या विषयात भरीव कामगिरी केल्याबद्दल मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रितेश जैन, आकाश बडगुजर, देविदास वाणी, राहुल निकम, उदय बारी, ज्ञानेश्वर बुंदे, अमोल चौधरी, पंकज क्षत्रिय, डॉ रवींद्र सोनार, प्रथमेश भावसार आदींनी सीए मुकेश चोरडिया यांचा सत्कार केला.

# जिद्द,चिकाटीच्या जोरावर यशाला घालता येते गवसणी : अॅड.संदीप पाटील

प्रतिनिधी । चोपडा

**एखादे यश मिळवण्यासाठी ठाम निर्धार, जिद्द आणि अंतिम शिखरावर पोहोचण्यासाठी आवश्यक असलेले धाडस व सातत्यपूर्ण प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे असतात. याच गुणांच्या जोरावर विद्यार्थी यशाला गवसणी घालू शकतात, असे प्रतिपादन महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. संदीप पाटील यांनी केले.**



चोपडा येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात विविध स्पर्धांमध्ये राष्ट्रीय व विद्यापीठ स्तरावर घवघवीत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. संदीप पाटील होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता पाटील उपस्थित होत्या. यावेळी चंदना नेटके या विद्यार्थिनीला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभागातर्फे देण्यात येणारा प्रथम शिक्षित विद्यार्थिनी पुरस्कार (५००० रु. रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र) प्राप्त झाला. तसेच निरंजन रेवसिंग बारेला या विद्यार्थ्याला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व जैन इरिगेशन,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय रांगोळी स्पर्धेत प्रथम पारितोषिक (५००० रु. रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र) प्राप्त झाले. त्याबद्दल या दोन गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष अॅड. संदीप पाटील व संस्थेच्या सचिव डॉ.स्मिता संदीप पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य प्रा.डॉ.के.एन.सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ.आर.एम.बागुल, प्रा.डॉ.ए. बी.सूर्यवंशी, समन्वयक डॉ.शैलेशकुमार वाघ, मनोज नेटके, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.डी.डी.कर्दपवार, डॉ. एम.एल.भुसारे, चेतन बाविस्कर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ यांनी केले.

# शेतीपीक नुकसानग्रस्त भागाची आ.प्रा.चंद्रकांत सोनवणेंकडून पाहणी

## अडावद भागात अवकाळी पाऊसाने पिके जमीनदोस्त; बळी राजा हतबल; पारदर्शक पंचनामे करण्याचे निर्देश

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील वर्डी, गरताड, कुरवेल या गावांमधील ग्रामस्थांसह मका, केळी व इतर शेत पीक नुकसानीचा आढावा घेत दि.३ रोजी आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच कुरवेल येथील जिल्हा परिषद शाळेचे वादळी पावसामुळे नुकसान झाले. या शाळेला भेट देऊन त्यांनी परिस्थिती जाणून घेतली.**



तालुक्यातील सर्व नुकसान बाधित गावांमध्ये तात्काळ पारदर्शक पंचनामे करून एकही नुकसान बाधित शेतकरी वंचित राहू नये, याबाबत काळजी घेण्याचे प्रशासनाला निर्देश दिले. एमएसईबी अधिकारी यांच्याकडून नुकसानीबाबत आढावा घेऊन आवश्यक सर्व उपाययोजना करून शहरी व ग्रामीण (कृषीसह) वीजपुरवठा लवकरात लवकर सुरवात करण्याबाबत आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी निर्देश दिले. यावेळी भाऊसाहेब थोरात तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे, गटविकास अधिकारी अंजली बर्गे, मुख्याधिकारी रामनिवास झंवर, एमएसईबी अधिकारी बोरसे तसेच क्षेत्रीय महसूल, कृषी, ग्रामविकास कर्मचारी उपस्थित होते.

अडावद येथे नुकत्याच झालेल्या चक्रीवादळ आणि अवकाळी पाऊसाने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असून पुन्हा शेतकरी पुन्हा संकटाच्या खाईत सापडला आहे.

ऐन पिक काढणीच्या वेळेस गहू, ज्वारी, बाजरी कांदा, केळी या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी राजा चार महिने काबड कष्ट करून लहान मुलांप्रमाणे



पिकांचे संगोपन करतात. त्यात लोडशेडींगसह विविध अडचणींना सामोरे जावून काळ्या आईच्या कुशीत पीकं फुलवित असतात. अन् शेवटच्या क्षणी अशा अवकाळी पावसामुळे धान्य घरात येण्याचे वेळेस पीक जमीनदोस्त होऊन तोंडचा घास निसर्ग हिरावून नेत असेल तर शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे? असा यक्षप्रश्न निर्माण होत आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे बळीराजाचा पुरता खचून गेला आहे. जगाच्या पोशिंद्याला भीक मागायची वेळ येऊन ठेपेल. त्या आधीच शासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत शेतकऱ्यांमधून व्यक्त केले जात आहे.